संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
अंतर्गत

# या.द.व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती.

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमीत कार्यक्रम

## २०१६-१७

# निबंधात्मक अहवाल

(फोटोसह)


| कार्यक्रम अधिकारी | महिला कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. जे. व्ही. गायकवाड** | **प्रा. डॉ. एस. एस. भूयार** | **प्रा. एम. व्ही. जगताप** |

# या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा
## ता. तिवसा, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

## *नियमित कार्यक्रम अहवाल २०१६-२०१७*

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे विविध समाजपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ रा. से. यो. समन्वयक डॉ गणेश मालटे यांचे मार्गदर्शन व सुचनेनुसार वर्षभर विविध कार्यक्रम घेण्यात आले याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा मनोज व्ही. जगताप यांनी भरीव स्वरुपाचे सहकार्य व प्रोत्साहन दिले कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ जे. व्ही. गायकवाड यांनी याचवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेची जबाबदारी स्विकारली महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस.एस. भुयार यांनी मागील वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजनेची धुरा सांभाळत आहे. याशिवाय सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा रवि गावंडे तसेच प्रा रुपाली इंगोले यांनी मोलाचे योगदान दिले आहे. वृक्षसंकलन व वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन बंधारा निर्मिती, रक्तदान शिबिर, सिकलसेल आजार नियंत्रण, एडस जनजागृती अभियान, स्त्रीभृणहत्या विरोधी रॅली, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा, पाणी अडवा पाणी जिरवा, स्वस्थ भारत व स्वच्छ भारत अभियान, हागणदारी मुक्त ग्राम अभियान, वृक्ष दिंडी, स्वच्छता अभियान, महिला सक्षमिकरण, साक्षरता रॅली, राष्ट्रीय मतदार दिन रॅली, गाजर गवत व प्लास्टीक कचरा निर्मुलन अभियान, वित्तीय साक्षरता अभियान, संविधान दिन कार्यक्रम तसेच थोर महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी इत्यादी उपक्रम सन २०१६-१७ मध्ये राबविण्यात आले आहेत. त्याचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे देत आहे

### १) जागतिक योग दिन :-

शासनाच्या निर्देशाप्रमाणे दि १ जुलै २०१६ ला जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमाचे आयेजन मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले. शारिरीक शिक्षण

संचालिका तथा सहकार्यक्रम अधिकारी प्रा. रुपाली इंगोले यांनी आपल्या जीवनामध्ये योगासनाचे काय महत्व आहे. ते सांगुन आरोग्याच्या दृष्टीने सहज- शक्य असे महत्वपुर्ण आसने करुन दाखविली त्यानुसार प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रा.से. यो. विदयार्थ्यांनी त्यामध्ये सहभाग घेतला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.



## २) वृक्षसंकलन व वृक्षारोपण अभियानः

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे दिनांक १ जुलै २०१६ रोजी महाविद्यालयामध्ये सकाळी १० ते १ या दरम्यान वृक्षरोपनाचा कार्यक्रम संपन्न झाला. वृक्षरोपन कार्यक्रमाकरीता प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डी. एच. मेश्राम सर अध्यक्ष म्हणून प्राचार्य मनोज व्ही जगताप सर उपस्थित होते. वृक्षसंकलन व वृक्षरोपन पूर्वनियोजित कार्यक्रमाध्ये महाविद्यालयातील सर्वच विभागातील शिक्षक सहभागी झाले होते. प्रत्येक शिक्षकांनी दोन-दोन वृक्षांची लागवड करून सहभाग नोंदविला विशेष म्हणजे शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गानी सुध्दा यामध्ये सहभाग नोंदवून वृक्षारोपण केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाने वृक्षारोपणाकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक रोपवाटीका शिवणगांव ता. तिवसा येथून दि. २८/६/२०१६ रोजी ५० रोपाची उचल केली महाविद्यालयातील ०३ रोपे अशी एकूण ५३ रोपाची लागवड दि. १/०७/२०१६ ला सर्वाच्या हस्ते करण्यात आली. लागवड केलेल्या सर्व रोपाना प्रत्येक कर्मचाऱ्याने दोन रोपाचे / वृक्षांचे जगवण्याकरीता संगोपन करावे अशी अपेक्षा प्राचार्य मनोज व्ही जगताप यांनी व्यक्त केली तसेच १ जूलै ते ७ जूलै या दरम्यान महाविद्यालयातील उर्वरीत






जागेवर वृक्षारोपण करून 'वन महोत्सव' वनसप्ताह साजरा करण्यात यावा तसेच वृक्षाच्या संगोपनासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न करावे नवीन वृक्षरोप लावावे रोपाना ट्री-गार्ड लावावे, खत देणे, पाणी देणे, वृक्षांचे संवर्धन करण्याचे आव्हान सर्व कर्मचाऱ्यांना करण्यात आले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यामध्ये मोठ्या संख्यांने सहभागी झाला होता. मुक्त विद्यापीठाचे कर्मचारी व तासिका तत्वावरील प्राध्यापकांनी यामध्ये सहभाग नोंदविला. ऑगस्ट महिन्यात महाविद्यालय परिसरात व दत्तक ग्राम येथे वृक्षारोपण करण्यात आले.

## ३) स्वस्थ भारत व स्वच्छ भारत अभियान :

भारत सरकारने 'स्वस्थ भारत व स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत विविध कार्यक्रमाची अंमलबजावनी करण्याकरीता प्रत्येंक पंधरवाड्याला एक संकल्पना निवडून त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे कळविले आहे. त्यानुसार दिनांक १ ते ३१ ऑगस्ट २०१६ या दरम्यान नगरपरिषदेच्या अथवा नगरपंचायतीच्या क्षेत्रात राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे श्रमदानाचे कार्य करून परिसर स्वच्छ करण्याकरीता सर्व रा. से. यो. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सहभाग घेतला नगर पंचायत कार्यालय तिवसा यांच्या पत्रान्वये १ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी १० वा सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देवून श्रमदानाच्या कार्यास सुरूवात करण्यात आली दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०१६या दरम्यान शहरातील विविध भागात श्रमदान करून स्वच्छता उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. मनोज जगताप,

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व इतर प्राध्यापकांनी सहभागी होवून स्वच्छतेच्या कार्यामध्ये सहभाग नोंदविला.





## ४) क्रांती दिन :-

९ ऑगस्ट २०१६ ला क्रांतीदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य मनोज जगताप यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. प्रा सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वातंत्र्य विरांना अभिवादन करुन त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्ष प्रा. मनोज जगताप यांनी स्वातंत्र्य लढयातील प्रेरक गोष्टीला उजाळा दिला. या कार्यक्रमाला प्रध्यापक वृंद व विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते.



## ५) शिक्षक दिनः-

५ सप्टेंबर २०१६ रोजी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन याच्या जयंतीनिमित्त शिक्षकदिनाचे आयोजन मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले या दिवशी स्वयंशासीत महाविद्यालयाअंतर्गत रा. से. यो.स्वयंसेवकांनी शिक्षकाची भूमिका पार पाडली. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना एक वेगळया प्रकारचा अनुभव आल्याचे त्यांनी सांगितले. या दिनी शिक्षकांचे विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या कार्यक्रमामध्ये बहुसंख्येनी विदयार्थी सहभागी झाले होते.



## ६) गाजरगवत निर्मुलन अभियानः-

दि. १७ सप्टेंबर २०१६ ला मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यलय परिसरात गाजरगवत निर्मुलन अभियान उपक्रम राबविण्यात आला रा.से.यो.स्वयंसेवक तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. गावंडे, डॉ.संगिता भूयार, प्रा.रुपाली इंगोले यांच्या उपस्थितीत महाविदयालयीन परिसर तसेच महाविद्यालयाच्या आजु-बाजुच्या परिसरातील गाजरगवत निर्मुलन करण्यात आले.



## ७) रा.से.यो. स्थापना दिनः-

दि. २४ सप्टेंबर २०१६ रोजी प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो. स्थापना दिनाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये रा.से.यो. च्या सल्लागार समितीचे सदस्य प्रा सोळंके यांनी रा.से.यो. ची ध्येयधोरणे व उदिष्टये समजावून सांगितली तसेच प्राचार्य मनोज जगताप यांनी रा.से.यो.स्वयंसेवकांना पार पाडावयाची कर्तव्ये समजावून सांगितली या कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद व बहुसंख्येनी विद्यार्थी सहभागी झाले होते.



## ८) महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती दिनी स्वच्छता अभियानः-

२ आक्टोबर २०१६ ला महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती निमित्य स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले. महात्मा गांधीच्या श्रमदानाच्या विचारांचा वारसा डोळ्यासमोर ठेवून महाविद्यालयातील परिसराबरोबरच आजु-बाजुचा परिसर स्व्च्छ करण्यात आला तसेच डॉ संगिता भूयार यांनी

'जय जवान जय किसान' व अहिंसात्मक परोधर्म' या वाक्याचे महत्त्व विदयार्थ्यांना पटवून दिले. या कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद तसेच बहुसंख्येनी विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.



## ९) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी :-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी सभा मंडप, गुरूकुंज मोझरी येथे दि. १७.१०.२०१६ राजी एक दिवसीय कार्यशाळेचे महाराष्ट्र शासन समाजिक न्याय विभाग सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय अमरावती यांच्या वतीने करण्यात आले होते 'नागरी हक्क संरक्षण कायदा अंमलबजावणी यंत्रणा' या विषयांच्या अनुषगांने कार्यशाळेचे आयोजन गुरूकुंज मोझरी येथे करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील रा. से.यो. चे ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवात सहभागी होऊन राष्ट्रसंताचे विचार सर्व विद्यार्थ्यांनी ऐकले पुण्यतिथी आयोजनाच्या महोत्सवामध्ये रा. से. यो. विदर्थ्यांनी स्वयंमस्फुर्तीने सहभागी झाले तसेच महाविद्यालयात राष्ट्रासंत तुकडोजी महाराजांना अभिवादन करण्यात आले.



## १०) दत्तक ग्राम येथे हगनदारी मुक्त गाव, ग्राम स्वच्छता अभियान, अंधश्रध्दा व व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे आयोजन :-

दिनांक २६ नोव्हें व २८ नोव्हें २०१६ रोजी रा.से.यो पथकाने दत्तक ग्राम शेंदोळा (खुर्द) येथील ग्रामस्थाशी क्रार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम गायकवाड, प्रा. रवि गावडे यांनी चर्चा करून हगनदारी मुक्त गाव, ग्राम स्वच्छता अभियान, अंधश्रध्दा व व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाअंतर्गत रा.से.यो. विद्यार्थ्याचे गट करून ग्रामस्वच्छता तसेच हगनदारी मुक्त गाव, अधंश्रध्दा व व्यसनमुक्ती या बाबतचा संदेश ग्रामस्थापर्यंत पोहचविला.




ज्यांच्या घरी शौचालये नाही तेथे जाऊन शौचलयाचे फायदे सांगुन ग्रामस्वच्छतेचा संदेश घरो-घरी जाऊन दिला. याबरोबर जल दिंडी अंतर्गत पाण्याची महत्त्व पटवून सांगितले जीवनामध्ये पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे त्याचा जपून वापरा करा असा महत्त्वाचा संदेश गावकऱ्यांपर्यंत पोहचविला. या कार्यक्रमासाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम गायकवाड, प्रा. रवि गांवडे, डॉ. संगीता भुयार, प्रा. रूपाली इंगोले यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला प्राचार्य मनोज जगताप यांचे मोलाचे सहाकार्य लाभले. दत्तक ग्रामथांनी यामध्ये सहभाग नोंदविला.

## ११) संविधान दिन :-

दि २६ नोव्हेंबर २०१६ ला संविधान दिना निमित्य मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या अध्यक्षतेखाली ' भारतीय संविधानाचे ' वाचन करण्यात आले. तसेच रा.से.यो. सह कार्यक्रम


अधिकारी प्रा. रवि गांवडे यांनी संविधानाचे महत्व विशद करून आपल्या प्रति असलेच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. तसेच अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य मनोज जगताप यांनी भारताचे लांबलचक संविधान आणि त्यांची गरज का भासली यावर प्रकाश टाकला या कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद व बहुसंख्येनी विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.



## १२) एड्स निर्मूलन, सिकलसेल आजार नियंत्रण रॅलीचे आयोजन

दि १ डिसें २०१६ ला एड्स निर्मूलन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. एच.आय.व्ही बाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने डॉ. पाटील आर.जी. यांना निमंत्रित करण्यात आले त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून एच. आए. व्ही बाबातची संपूर्ण माहिती देवून. त्यांची लागण होण्याची कारणे तसेच त्या बाबत घ्यावयाची काळजी यावर मार्गदर्शन केले. सिकलसेल आजाराबाबत माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद व बहुसंख्येनी विद्यार्थी सहभागी झाले. दि. १ डिसें २०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांच्या वतीने जागतिक एड्स दिन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते रॅलीमध्ये ग्रामीण रूग्णालय तिवसा येथिल कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता सकाळी १०.३० वा रॅलीला महाविद्यालयापासून प्राचार्य श्री मनोज गजताप यांनी हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ झाला घोषणा वाक्ये, जनजागृतीची पोस्टरे या द्वारे

एड्स रोगाविषयी जनजागृती करण्यात आली रॅलीमध्ये महाविद्यातील ज्युनिअर कॉलेजचे प्रा. काळकर सर, प्रा. मोहोड सर, प्रा. डॉ. गायकवाड कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.






### १३) वित्तीय साक्षरता अभियान :


संत गाडगे बाबा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे पत्र क्र.१७/रा.से.यो/२४२/२०१६ दि. ११.१२.२०१६ अन्वये महाविद्यालयात वित्तीय साक्षरता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. महेंद्र मेटे, प्रा. देशमुख, प्रा. नेमावत यांनी बँकाचे व्यवहार, कार्यप्रणाली, रोकड विरहित आर्थिक व्यवहार याविषयी माहिती सांगितली. प्रा. उमेश कडू यांनी

या प्रसंगी माहिती कॉम्प्युटरद्वारे सांगितली. प्राचार्य मनोज जगताप यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.




## १४) पर्यावरण जनजागृती अभियान :-

दि. १९ डिसें २०१६ रोजी महाविद्यालयात पर्यावरण जनजागृती सप्ताहअंतर्गत स्वच्छता मित्र वर्क्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. पंचायत समिती व तिवसा व रो.से.यो. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन केले होते. जीवनामध्ये स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगण्याचे कार्य मा. अध्यक्ष प्रा. मनोज जगताप यांनी केले. "स्वच्छतेचे नायक आम्ही स्वच्छतेचे पाईक आम्ही" हे ब्रिदवाक्य घेऊन प्रा. सोळंके सरांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर कार्यक्रम अधिकारी प्रा. गायकवाड उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.



दि. २० डिसें. २०१६ ला मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण जनजागृती या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमा अंतर्गत पर्यावरण जनजागृती करणे ही काळाची गरज आहे यावर सवीस्तर मार्गदर्शन रा.से.यो सल्लागार समीतीचे सदस्य प्रा. सोळंके यांनी केले तसेच 'पर्यावरण जन जागृती ही काळाची गरज'हा विषय देवून विद्यार्थांसाठी निबंध स्पर्धचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झालेत.

## १५) गाडगे महाराज पुण्यतिथी निमित्य स्वच्छता अभियान :-

दि. २० डिसें २०१६ ला गाडगे महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम गायकवाड यांनी गाडगे महाराजांनी केलेले समाज प्रबोधन आणि आज त्यांची कशी गरज आहे हे विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. तसेच प्राचार्य मनोज जगताप यांनी त्यांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.




## १६) प्लॉस्टिक कचरा कचरा निर्मुलन अभियानः

तिवसा बस स्थानक परिसरामध्ये स्वच्छता अभियान दि २१ डिसें २०१६रोजी प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनानुसार प्लास्टीक कचरा निर्मुलन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. जयराम गायकवाड, प्रा. रवि गांवडे, डॉ.

संगीता भुयार, प्रा. रूपाली इंगोले तसेच प्रा सोळंके प्रा. माधुरी धिवरे, डॉ. निता गिरी यांच्या उपस्थितीत 'बसस्थानक तिवसा' परिसरातील प्लास्टीक कचरा गोळा करण्यात आला तसेच सर्व परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला. त्यामुळे तिवसा बस स्थानकाचे मॅनेजर यांनी रा.से.यो. पथकांचे आभार मानले. या कार्यक्रमामध्ये बहुसंख्येंनी रा.से.यो स्वंयसेवक सहभागी झाले होते तसेच प्राध्यापक वर्ग सहभागी झाले होते.





## १७) डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती उत्सव :-

शिक्षण महर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जंयती उत्सव दि २७ डिसें ते ३० डिसें २०१६ या दरम्यान साजरा करण्यात आला. २७ डिसें ला सकाळी 'जीवनरथ मिरवणूकीचे आयोजन' करण्यात आले. तसेच विविध कार्यक्रम घेण्यात आले वादविवाद स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, तसेच गाडगे महाराजाच्या छायाचित्राचे प्रदर्शन घेण्यात आले. या सर्व कार्यक्रमामध्ये रा.से.यो. स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.



## १८) सावित्रीबाई फुले जयंती दिनी महिला आरोग्य व स्त्री सक्षमीकरण कार्यक्रम:-

दि. ३ जाने २०१७ रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून 'महिला आरोग्य व स्त्री सक्षमीकरण कार्यक्रम' घेण्यात आला. सावित्रीबाई फुलेनी स्त्रीयांना शिक्षणाची दारे खुली करून दिली असे मत मार्गदर्शकांनी व्यक्त केले तसेच स्त्रीने आरोग्याविषयी कशाप्रकारे काळजी घ्यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन डॉ. भोयर यांनी केले. स्त्री सक्षमीकरण्याबाबत मार्गदर्शन करताना ॲड. अल्का काळे यांनी स्त्रीयांना कायद्याचे ज्ञान असने कीती महत्त्वाचे आहे हे छोटे-छोटे उदाहरण देवून पटवून दिले. तसेच अध्यक्षीय भाषणातून महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. संगीता भुयार यांनी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यामागील भूमिका विशद केली या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

## १९) राष्ट्रीय मतदार जनजागृती अभियान:-

महाराष्ट्र राज्य, मा.जिल्हाधिकारी, अमरावती पत्र क्र. सनि / कावि / ३८२ / २०१६ दि. १२ जाने २०१७ नुसार दि. २५ जाने २०१७ रोजी रा.से.यो. पथकाच्या वतीने तिवसा शहरामध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थाच्या सहभागातून मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. मतदार जागृत व्हावा तसेच मतदानाच्या प्रक्रियेमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन निर्भिडपणे मतदान करावे या विषयी रॅलीद्वारे जनजागृती करण्यात आली तसेच दुपारी २.०० वा. महाविद्यालयात 'राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम' प्रा. अनिल वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. संगीता भुयार, प्रा. सोळंके प्रा. जयराम गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला या कार्यक्रमाला रा. से. यो. विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



## २०) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा:

स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती निमित्ताने महाविद्यालयामध्ये दि १६ जाने २०१७ रोजी 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन' स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय सामाजिक संस्था तिवसा व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. स्पर्धा परीक्षा कार्यशाळेमध्ये विविध विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी श्री. धडांगे, मा. नायब. तहसिलदार घाडगे साहेब, तसेच मुख्याधिकारी नगरपरिषद, तिवसा यांना मार्गदर्शनासाठी बोलविण्यात आले होते. कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मनोज व्ही जगताप यांनी भुषविले प्रमुख अतिथी म्हणून प्रा. सी. जी सोळंके कार्यक्रम अधिकारी डॉ. जे. व्ही. गायकवाड श्री. राहूल धडांगे सचिव हे उपस्थित होते आजचे जग स्पर्धेचे आहे. स्पर्धेशिवाय आपण जीवन जगू शकत नसल्याने सर्वानाच स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे लागणार आहे त्यामुळे सर्वांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करावी असे आव्हान मार्गदर्शकांनी केली स्वंयशिस्त, वाचन प्रामाणिक प्रयत्न, एकाग्र चित्ताने अभ्यास केल्यास स्पर्धा परीक्षेमध्ये हमखास यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही असे मत मार्गदर्शकांनी केले. यामध्ये महाविद्यालयातील सर्वच वर्गाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग या कार्यक्रमा मध्ये उपस्थित होते.








## २१) रक्तदान शिबीर व रक्तगट तपासणी :

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने दिनांक १० फेब्रुवारी २०१७ रोजी रक्तदान शिबीर व रक्तगट तपासणीचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबीरामध्ये महाविद्यालयातील व तिवसा शहरातील ३५ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले कर्तव्य पार पाडले. यासोबतच ५५ मुलांची रक्तगट तपासणी करण्यात आली. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्रे देऊन त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. आयुष्य ब्लड बँक नागपूर यांच्या सौजन्याने महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबीराचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले.



## २२) शिवाजी महाराज जयंती :-

दि. १९ फेब्रुवारी २०१७ शिवाजी महाराज जंयती निमीत्य 'शैक्षणिक जनजागृती' कार्यक्रमाचे आयोजन मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

'शैक्षणिक जनजागृती' या कार्यक्रमाअंतर्गत मार्गदर्शक म्हणून श्री प्रसन्ना मोहोड सर हे लाभले होते त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून शिक्षणाचे महत्व विशद करून त्या सोबतच स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे शिवाजी महाराज जयंती निमित्य शिवाजी महाराजांचा इतिहास सांगितला रा.से.यो. स्वंयसेवक, प्राध्यापक वृंद उपस्थित होता.


## २३) जागतिक महिला दिन :-

दि. ८ मार्च २०१७ ला जागतिक महिला दिनाचे आयोजन मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले. महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. संगीता भुयार यांनी महिलांनी केलेले कार्य प्राचिन काळापासुन तर आजपर्यंत यावर प्रकाश टाकून सर्वच क्षेत्रात महिला अग्रेसर आहे हे उदाहरण देऊन पटवून दिले. तसेच विद्यार्थीनी सुध्दा विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला यावर विचार व्यक्त केले या कार्याक्रमामध्ये बहुसंख्येनी विद्यार्थी सहभागी झाले होते.




## २४) महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती :-

दि. १४ एप्रिल २०१७ रोजी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मा. प्राचार्य मनोज जगताप यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. प्रा. सोळंके यांनी आपल्या मार्गदर्शनातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या संविधात्मक कार्यावर प्रकाश टाकून महात्मा फुले चे समाजप्रबोधनात्मक कार्य व त्यांनी केलेले समाज परिवर्तन यावर प्रकाश टाकला व याप्रसंगी माजी प्राचार्य प्रा. डी. एच. मेश्राम यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील पैलूंवर प्रकाश टाकला. मा. अध्यक्ष प्राचार्य मनोज जगताप यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी जी घटना दिली ती किती चांगली आहे ते उदाहरण देऊन सांगीतले. या कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



## २५)  व्यसन मुक्ती कार्यक्रम :-

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक डी.डी. २०९/ प्र. क्र. १४९ / सुधार - नुसार दि. १४ एप्रिल २०१७ या दिवशी प्राचार्य मनोज जगताप यांच्या मार्गदर्शना खाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सी. जी. सोळंके उपस्थित होते. या कार्यक्रमाअंतर्गत रा. से. यो. स्वंयसेवक विद्यार्थी प्राध्यापक वृंद यांना व्यसन मुक्ती शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक तसेच बहुसंख्यांनी विद्यार्थी उपस्थीत होते.



******

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
या.द.व.देशमुख कला व वाणिज्य
महाविद्यालय, तिवसा

प्राचार्य
या.द.व.देशमुख कला व वाणिज्य
महाविद्यालय, तिवसा

या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा. (9)

राष्ट्रीय सेवा योजना

नियमित कार्यक्रमाचे फोटो. (२०१६-२०१७)

## वृक्षारोपण- कार्यक्रम



## " वृक्षसंवर्धन -



## या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा.
### राष्ट्रीय सेवा योजना → २०१६-२०१७
### नियमित कार्यक्रमाचे फोटो.

"स्वच्छ भारत अभियान"




गाडगे बाबा पुण्यतिथी - स्वच्छता अभियान.



या: द.क. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, निवसा ③

राष्ट्रीय सेवा योजना

नियमित कार्यक्रमाचे फोटो (२०१६-२०१७)

## प्लास्टीक व कचरा निर्मूलन अभियान




## "महाविद्यालय परिसर स्वच्छता अभियान"



या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा

राष्ट्रीय सेवा योजना (2)

नियमित कार्यक्रमाचे फोटो (२०१६-२०१७)

'शिक्षक दिन'




'रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर'



या. द. व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा (५)

राष्ट्रीय सेवा योजना

नियमित कार्यक्रमाचे फोटो (२०१६-२०१७)

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती -"



"एड्स जनजागृती व सिकलसेल आजार नियंत्रण -"

